# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

## ३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७,मुंबई-४००००१.

---

क्रमांक १०/अेडीजी/अेडीएम/विकासशुल्क/ ३०८
दिनांक : १ जून २००१

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय ,अशासकीय अनुदानित
व विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र पदविका
अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था.

विषय- विकास शुल्क लागू करणेबाबत.

संदर्भ- १. शासन निर्णय क्रमांक टिईएम ३३/२०००/७१३१०/(१५/२०००)
तांशि-१,दि.२०.४.२०००
२.शासन निर्णय क्र.टिईएम ३३१६/(७६५६)तांशि-१,दि.१५.५.२०००

वरील संदर्भाधीन शासन निर्णय, दि. २०.४.२००० अन्वये शासनाने मॅनेजमेंट संस्था,फार्मसी संस्था, (पदवी/पदविका )/आर्किटेक्चर संस्था (पदवी/पदविका)यांना शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रतिवर्ष विकास शुल्क लागू करण्यास मंजूरी दिली आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडत आहे.

सदर विकास शुल्क खालील मार्गदर्शक तत्वांनुसार शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून लागू करण्यात यावे.

१. शिक्षण शुल्काव्यतिरिक्तची भरावयाची शुल्के इ.बी.सी. व बी.सी. विद्यार्थ्यांना देखील लागू आहेत. त्यामुळे विकास शुल्क त्यांना देखील लागू राहील. कारण विकास शुल्क म्हणजे टयुशन फी (शिक्षण शुल्क )नाही.

२ केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालय निर्णय दिनांक १८ मार्च १९९७ मध्ये मुद्दा क्रमांक ६.६ 'इ' व ' एफ ' व ६.७ सी मध्ये समाविष्ट केलेल्या बाबींवरच फक्त विकास शुल्कातील रक्कम खर्च करावी (भारत का राजपत्र मधील केंद्रशासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालय यांच्या दि. १८ मार्च १९९७ च्या निर्णयामधील मुद्दा क्रमांक ६.६ व ६.७ ची प्रत सोबत जोडत आहे.)सर्व शासकीय संस्थांनी डेव्हलपमेंट फंड पी.एल.ए.मध्ये ठेवावा.(आता अस्तित्वात असलेल्या पध्दतीप्रमाणे )व सर्व अनुदानित व विनाअनुदानित संस्थांनी त्यांच्या कॅश बुकामध्ये डेव्हलपमेंट फंडाची वेगळी नोंद ठेवणे बंधनकारक आहे.

३.सदर विकास शुल्क शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पासून फक्त प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडूनच आकारावयाचे आहे.

सदरचे विकास शुल्क हे शैक्षणिक वर्ष २०००-२००१ पूर्वी प्रथमवर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून वसूल करता येणार नाही.

शैक्षणिक वर्ष २०००-२००१ साठी प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडूनच खालीलप्रमाणे शुल्क आकारावे.

औषधनिर्माणशास्त्र

| | शासकीय व अनुदानित | विनाअनुदानित |
|---|---|---|
| शिक्षणशुल्क | रु. ६,०००/- | रु. १०,०००/- |
| विकास शुल्क | रु. ३,०००/- | रु. ७,०००/- |
| इतर शुल्क * | रु. १५०/- | रु. १५०/- |

* शासन निर्णय क्रमांक ३३९६/(७६५६)तांशि-१,दि.१५ मे २००० मधील तपशिलाप्रमाणे )

शैक्षणिक वर्ष २०००-२००१ साठी द्वितीय व तृतीय वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारावे.

औषधनिर्माणशास्त्र

| | शासकीय व अनुदानित | विनाअनुदानित |
|---|---|---|
| शिक्षणशुल्क | रु. ६,०००/- | रु. १०,०००/- |
| इतर शुल्क * | रु. ५५० | रु. ५५० |

* शासन निर्णय क्रमांक ३३९६/(७६५६)तांशि-१,दि.१५ मे २००० मधील तपशिलाप्रमाणे सुरक्षा ठेव रु. २००/-वगळून )

वर नमूद केलेल्या दराप्रमाणेच विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क,विकास शुल्क व इतर शुल्क आकारावे. या व्यतिरिक्त कोणतेही शुल्क आकारु नये.

( न. वा. पाथ्रीकर )
**संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत-

१.सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२.सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई.

३. उपसचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,विभागीय कार्यालय,पुणे/नागपूर/औरंगाबाद.

४.सर्व प्रवेश केंद्र प्रमुख

५.कार्यासन क्रमांक २,मुख्य कार्यालय,मुंबई.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक टिईएम २३/२०००/७१३१०/(१५/२०००)ताशि-१
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
दिनांक :- २० एप्रिल २०००

संदर्भ:- १)शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
क्रमांक टिईएम ३३९८/१२८६८/(४४३/९८)ताशि १
दिनांक ५ एप्रिल १९९९ व दिनांक ६ एप्रिल १९९९
२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली
यांचे एफ क्रमांक एनडब्ल्यु/फी/कॉम/९७,
दिनांक ३० नोव्हेंबर १९९९ चे पत्र
३)संचालक,तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई-१
यांचे क्रमांक १०/अेडीजी/अेडीएम/२०००/१५९
दिनांक १४ जानेवारी २००० चे पत्र.

शासननिर्णय :-

संदर्भाधीन दिनांक ५ एप्रिल १९९९ व ६ एप्रिल १९९९ च्या शासन निर्णयान्वये शासनाने अभियांत्रिकी पदवी महाविद्यालये व अभियांत्रिकी पदविका तंत्रनिकेतनामध्ये शैक्षणिक वर्ष १९९९-२००० पासून प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी विकास शुल्क लागू केले आहे. आता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ३०.११.१९९९ च्या पत्रान्वये अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयाबरोबर व अभियांत्रिकी पदविका तंत्रनिकेतनाबरोबर मॅनेजमेंट संस्था,फार्मसी संस्था (पदवी व पदविका )आर्किटेक्चर संस्था (पदवी व पदविका )यांना विकास शुल्क निश्चित केले आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निश्चित केलेले विकास शुल्क राज्यातील संस्थांना लागू करण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. संदर्भाधीन दिनांक ५ एप्रिल १९९९ व ६ एप्रिल १९९९ च्या शासन निर्णयान्वये शासनाने अभियांत्रिकी पदवी महाविद्यालये व अभियांत्रिकी पदविका तंत्रनिकेतनामध्ये शैक्षणिक वर्ष १९९९-२००० पासून प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी विकास शुल्क लागू केले असल्यामुळे आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निश्चित केल्याप्रमाणे मॅनेजमेंट संस्था,फार्मसी संस्था (पदवी व पदविका )आर्किटेक्चर संस्था (पदवी व पदविका )यांना सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे प्रतिवर्षी विकास शुल्क लागू करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे .

अ)व्यवस्थापनशास्त्र संस्था (एम.बी.ए/एम.एम.एस )

| | | |
|---|---|---|
| मुक्त जागा | | रु. ८,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| मुल्यभारित जागा | | रु.३७,५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अनिवासी भारतीयांसाठी जागा | अमेरिकन डॉलर | २,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |

ब) फार्मसी संस्था (पदवी व पदविका )

पदवी

| | | |
|---|---|---|
| मुक्त जागा | | रु. ६,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| मुल्यभारित जागा | | रु.१२,२५०/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अनिवासी भारतीयांसाठी जागा | अमेरिकन डॉलर | १,५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |

पदविका

| | | |
|---|---|---|
| शासकीय व अनुदानित संस्था | | रु. ३,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अशासकीय विना अनुदानित संस्था | | रु. ७,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अनिवासी भारतीयांसाठी जागा | अमेरिकन डॉलर | ५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |

क)आर्किटेक्चर संस्था (पदवी व पदविका )

पदवी

| | | |
|---|---|---|
| मुक्त जागा | | रु. ३,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| मुल्यभारित जागा | | रु.४,५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अनिवासी भारतीयांसाठी जागा | अमेरिकन डॉलर | १,५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |

पदविका

| | | |
|---|---|---|
| शासकीय व अनुदानित संस्था | | रु. ३,०००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अशासकीय विना अनुदानित संस्था | | रु. ४,५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |
| अनिवासी भारतीयांसाठी जागा | अमेरिकन डॉलर | १, ५००/- प्रतिवर्ष प्रतिविद्यार्थी |

३. हा शासन निर्णय श्री.रामदेवबाबा कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय,नागपूर या स ने उच्च न्यायालयात जी रिट याचिका क्रमांक १७८७/९९ दाखल केली आहे व त्या याचिकेच्या अंतिम निर्णयाचे अधिन राहून निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

(श्या.र.चौरे )

कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2005)
४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दू.क्र. : २६४७१२५५/२६४७०१९६ फॅक्स : ९१-०२२-२६४७३९८०
ई-मेल : director@msbte.com संकेत स्थळ : www.msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/लले/का-४०(परीक्षा)/बी-६/२०१७/ ११० दिनांक – 17 MAY 2017

कार्यालयीन आदेश

विषय – मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या परिक्षा विषयक शुल्काच्या दरामध्ये सुधारणा करण्याबाबत.

संदर्भ - १) कार्यालयीन आदेश क्र.मरातंशिमं/का-४०/बी-२/बी-६/२०१२/२१३, दि.१९ जून २०१२
२) दि.२७.०३.२०१७ रोजीच्या २६ व्या नियामक परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त

उपरोक्त संदर्भिय क्र.(१) च्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या अंतर्गत येणारे परीक्षा विषयक शुल्क आकारण्यात येत होते. सदर परीक्षा विषयक शुल्काच्या दरामध्ये संदर्भ क्र.(२) च्या मान्यतेनुसार खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| Course Type | Fee in Rs. |
|---|---|
| AICTE approved Semester and yearly pattern | 600/- |
| Architecture Courses Semester and yearly pattern | 700/- |
| State Government Approved Short Term Courses | 700/- |

W-17

उपरोक्त सुधारीत परीक्षा शुल्क हिवाळी २०१७ परीक्षेपासून लागू राहतील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई ५१

प्रत –

१. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई – ४०० ०५१
२. उपसचिव (तां), निकाल विभाग/ अभ्यासक्रम विभाग, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई – ४०० ०५१
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद
४. प्राचार्य, मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था ( संबंधीत विभागीय कार्यालयामार्फत )
५. लेखा अधिकारी, लेखा विभाग, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई - ५१

संचिका Year २०१७/Circular २०१७(P-१)

**व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) तसेच, इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४**

मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ०८ जुलै, २०२४.

**संदर्भ:** १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/ तांशि-४, दि.३१.०३.२०१६.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी २०१६/ प्र.क्र.२२१/शिक्षण -१, दि.३१.०३. २०१६

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दि.०७.१०.२०१७.

४) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.०६.०४.२०२३

**प्रस्तावना :** उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व कृषि व पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग या विभागांच्या अधिपत्त्याखालील शैक्षणिक संस्थांद्वारे राबविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेणाऱ्या इतर मागास प्रवर्ग (OBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) या प्रवर्गातील वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु.८.०० लाखापेक्षा कमी असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभ देण्यात येतो.

व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण ३६ टक्के इतके मर्यादित आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार (NEP) व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने व मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त व्हाव्या, तसेच महिला सक्षमीकरणांतर्गत आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेण्यापासून मुली वंचित राहू नयेत, ही बाब विचारात घेऊन राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०५.०७.२०२४ रोजी झालेल्या बैठकीतील विचारविनिमयाअंती पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय -:** राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized

Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यापैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात येत आहे. तसेच, यासाठी येणाऱ्या रु.९०६.०५ कोटी एवढ्या अतिरिक्त आर्थिक भारास मान्यता देण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.०६.०४.२०२३ मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. सर्व संबंधित प्रशासकीय विभागांकडून आर्थिक तरतूदी सुधारीत करुन, सदर योजनेचा निधी हा संबंधित प्रशासकीय विभागांच्या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करण्यात यावा. तसेच, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क लाभाच्या अंमलबजावणीकरिता सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आवश्यकतेनुसार स्वतंत्र आदेश निर्गमित करावे.

४. मराठा आरक्षण व सुविधा मंत्रिमंडळ उपसमितीच्या निर्णयानुसार ईडब्ल्यूएस प्रवर्गास इतर मागास प्रवर्गाप्रमाणे उत्पन्न मर्यादेचे निकष एकसमान करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने प्रस्तावित केल्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.०७.१०.२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

**अ)** ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे. तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई-वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्याचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचारात घेण्यात यावे.

**आ)** ईडब्ल्यूएस आरक्षणातून शैक्षणिक प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील. अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासून दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

५. उत्पन्न प्रमाणपत्राबाबतच्या उपरोक्त तरतुदी, "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. संबंधित प्रशासकीय विभागांनी वरीलप्रमाणे त्यांच्या शासन निर्णयांमध्ये सुधारणा करावी. याव्यतिरिक्त योजनेच्या अन्य अटी-शर्ती व कार्यपध्दती कायम राहतील.

७. सदर शासन निर्णय हा दि.०५.०७.२०२४ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०७०९१४२९३७४००८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SATISH JAGDERAO TIDKE

Digitally signed by SATISH JAGDERAO TIDKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=abbed596652773468508d937a99472988ebdda28db8c543b79abe527c99646f6, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEDB6CD16BD8FBD810E0A53F2B92CE7FD9AB37DD50427E28109CBB133F9887D3, cn=SATISH JAGDERAO TIDKE
Date: 2024.07.09 14:40:58 +05'30'

**( सतीश तिडके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
५. मा.सभापती/उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई
६. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
९. सर्व सन्माननीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई
१२. कुलगुरु, सर्व विद्यापीठे
१३. संचालक, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१४. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१६. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
१८. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
१९. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
२०. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२४. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२५. आयुक्त, कृषी, महाराष्ट्र राज्य, पुणे
२६. आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२७. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. संचालक, पशु संवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
२९. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, ता.मागणगांव, जि.रायगङ
३०. कुलगुरु,महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
३१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
३२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
३३. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
३४. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
३५. महालेखापाल - १ / २ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३६. महालेखापाल - १ / २ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
३७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
३८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
४०. सर्व संबंधित मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
४१. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४२. सर्वसंबंधित कार्यासने (तांशि-३/विशि-३/मशि-२/मशि-४/तांशि-५/तांशि-६/साशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
४३. निवडनस्ती/तांशि-४.